पुण्य नगरी




# सायबर तज्ञ प्रतीक्षा पांगे यांचे कार्य कौतुकास्पद - आ.चौगुले

**उमरगा :** मोबाईल वाढत्या वापरामुळे सायबर गुन्ह्याच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली आहे. सद्या विद्यार्थी व महिला या सायबर गुन्हेगारांचे लक्ष ठरत आहेत. याकरिता सायबर तज्ञ प्रतीक्षा पांगे यांच्याद्वारे केली जाणारी जनजागृतीचे कार्य कौतुकास्पद असुन पांगे यांच्यामुळे उमरगा तालुक्याचा नाव लौकिकही होत असल्याचे सांगत आमदार ज्ञानराज चौगुले यांनी त्यांचा सत्कार केला.

उमरगा तालुक्यातील कोरेगाव येथील रहिवाशी व सद्या राजर्षी शाहु महाविद्यालय लातूर येथे शिकत असलेली क्विक हील फाऊंडेशन व राजर्षी शाहु महाविद्यालय यांच्या माध्यमातून सायबर तज्ञ प्रतीक्षा पांगे यांच्या मार्फत मराठवाड्यात विविध ठिकाणी सायबर गुन्ह्याबाबत जनजागृती करण्यासाठी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत याबद्दल पांगे यांचा आ. चौगुले यांनी सत्कार केला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, युवती सेना मराठवाडा निरीक्षक आकांक्षाताई चौगुले, गणप्रमुख शरद इंगळे, विद्यार्थी सेना तालुकाप्रमुख संदीप चौगुले, युवा सेना शहर प्रमुख अमर शिंदे, राज शिंदे आदी उपस्थित होते.

Osmanabad Edition Edition
Sep 15, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com